# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/06/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत आंबेडकर चौक कन्हान येथील आकाश पान पॅलेस एसबीआय एटीएम जवळ दिनांक २१/०६/२०२३ चे १९.०० वा. ते १९.३० वा. दरम्यान डायल ११२ वर खबर मिळाली की, आबेडकर चौक कन्हान येथील विक्की नावाचा इसम सार्वजनिक ठिकाणी तलवार घेवुन धुमधाम करून शांतता भंग करीत आहे, अशा मिळालेल्या खबरेवरून पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ सहायक पोलीस निरीक्षक फुलझेले, पोलीस हवालदार मुदतसर, पोलीस नायक कुमरे, पोलीस शिपाई आकाश हे पंचनाम्यातील पंचासोबत आंबेडकर चौक कन्हान येथील आकाश पान पॅलेस एसबीआय एटीएम जवळ जावून पाहीले असता लोकांची गर्दी जमली होती व लोक भीती मुळे इकडे तिकडे पळत होते. **आरोपी नामे– विक्की क्रिष्णजी उके, वय ३२ वर्ष, रा. जवाहर नगर कन्हान तह. पारशिवनी** याची कन्हान पोलीसांनी अंगझडती घेतली असता एक लोखंडी धारदार टोकदार तलवार ज्याची एकुण लांबी ६७ सेमी व पाते ५० सेमी मुठ १७ सेमी व रूंदी अशा वर्णनाची मिळुन आल्याने आरोपीला शस्त्र बाळगण्याबाबत परवाना विचारला असता काणेत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे त्याने सांगितल्याने तो सार्वजनिक ठिकाणी अवैधरीत्या शस्त्र बाळगुन लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचे उद्देशाने फिरत असल्याचे दिसुन आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे नापोशि सचिन वेळेकर ब. नं. १८२८ पोस्टे कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. गणेश पाल ब. नं. ३६० मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर